महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

प्रशि. पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा) सत्र क्रमांक 111,

अंतिम परिक्षा, जानेवारी - 2015

| | | |
|---|---|---|
| पेपर क्रमांक | - 06 | एकुण गुण- 100 |
| विषय | - तपास (थेअरी) | वेळ - 1500 ते 1800 |
| दिनांक | - 17/01/2015 | वार - शनिवार |

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सूचना :

अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहे.
क. वाचनीय अक्षरात उत्तरे लिहावी.
ड. फक्त निळया / काळया पेनचाच वापर करावा.
इ. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
ई. मोबाईल फोन / पुस्तके परिक्षा कक्षात आणण्यास मनाई आहे.
उ. परिक्षा सुरु असतांना कॉपी करतांना किंवा बोलतांना आढळून आल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
ऊ. पुरवणी उत्तरपत्रिकेवर नाव व रोल नंबर लिहू नये.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

| | | गुण |
|---|---|---|
| प्र.1 | आरोपींना हातकडया लावणेबाबत सर्वोच्च न्यायालयाची मार्गदर्शक तत्वे काय आहेत? कोणत्या प्रकारच्या आरोपींना हातकडया लावू नयेत? | 10 |
| प्र.2 | गुन्हे उघडकीस आणण्यासाठी तपासी अंमलदारामध्ये कोणकोणते गुण आवश्यक आहेत? सोदाहरण लिहा. | 10 |
| प्र.3 | आरोपपत्रामध्ये कोणकोणत्या मुद्दयांचा समावेश असतो? विस्तृत लिहा. | 10 |
| प्र.4 | घटनास्थळाची जागा व परिस्थितीनुसार घटनास्थळाच्या निरीक्षणाच्या विविध पध्दती आकृतींसह स्पष्ट करा. | 10 |
| प्र.5 | **टिपा लिहा. (प्रत्येकी 05 गुण) [प्रत्येकी मर्यादा 10 ओळी]** | 20 |

**[अ]** भौतिक दुवे / पुरावा.
**[ब]** घटनास्थळाचे संरक्षण.
**[क]** कबूली जबाबांचे प्रकार.
**[ड]** ओळख परेड.

प्र.6 दिनांक 16/01/2015 रोजी 20.30 वा. अनील शर्मा, रा.समर्थ नगर, नाशिक यांनी तालूका पोलीस स्टेशन येथे येऊन कळविले की, ते कांदा व्यापारी असून दिनांक 16/01/2015 रोजी 19.15 वा.गंगापूर रोडने गंगापूर येथून नाशिककडे मोटारसायकलने परत येत असताना दहाव्या मैलाजवळ एक पांढऱ्या रंगाची इंडीका कार पाठीमागून वेगात आली व त्यांचे मोटारसायकलला आडवी घातली. त्यामुळे अनील शर्मा यांनी ब्रेक दाबून मोटारसायकल थांबवली असता सदर कारमधून दोन व्यक्ती खाली उतरल्या. दोन्ही व्यक्तींनी चेहऱ्यावर काळया रंगाचा रुमाल बांधलेला होता. त्यापैकी एका व्यक्तीने त्याचेकडील रिव्हॉल्वर अनील शर्मा यांचेवर रोखून त्यांचेजवळील रेक्झीन बॅग व मोबाईल देण्यास सांगितले, न दिल्यास गोळी मारणेची धमकी दिली. अनील शर्मा यांनी घाबरुन त्यांचेकडील एक रेक्झीन बॅग ज्यात 2 लाख रु.रोख रक्कम होती ती समोरील व्यक्तीच्या स्वाधीन केली. त्यानंतर दोन्ही व्यक्ती इंडीका कारमध्ये बसून नाशिकच्या दिशेने वेगात निघून गेले. इंडीका कारचा क्रमांक MH-12 G 478 असा होता.

**खालील प्रश्नांची या आधारे उत्तरे लिहा.**

| | | |
|---|---|---|
| **अ.** | अनील शर्मा यांची सविस्तर फिर्याद (कलमांसहीत) लिहा. | 10 |
| **ब.** | सदरचा गुन्हा उघडकीस आणणेकामी केलेल्या तपासाचे अनुषंगाने पहिल्या दिवशीची केसडायरी लिहा. | 10 |
| **क.** | गुन्हयाचे तपासादरम्यान आरोपी चिंटू गायकवाड व सुनील तिवारी यास अटक करणेत आली असून आरोपींचा पोलीस कस्टडी रिमांड मिळणेकामी रिमांड रिपोर्ट तयार करा. | 10 |
| **ड.** | पोलीस कस्टडी रिमांडदरम्यान आरोपी सुनील तिवारी याने त्याचे घराचे मागचे शेतात लपवून ठेवलेले गुन्हयातील वापरलेले रिव्हॉल्वर स्वखुशीने काढून देण्याची कबूली दिल्याने रिव्हॉल्वर हस्तगत करणेबाबतचा मेमोरंडम पंचनामा तयार करा. | 10 |

***